महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================================

जावक क्रमांक – ७६२/ ५८ दिनांक :- ३० एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा कोकण मंडळातर्फे प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील सदनिका विक्रीसाठी 'बूक माय होम' द्वारे ऑनलाईन अर्ज नोंदणीला प्रारंभ

अर्जदारास पसंतीची सदनिका निवडण्याची मुभा; विशिष्ट सदनिकेची निवड करण्याची संधी उपलब्ध

मुंबई, दि. ३० एप्रिल २०२५ :- कोकण गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या (म्हाडाचा घटक) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेअंतर्गत विक्री न झालेल्या विविध गृहनिर्माण योजनांमधील १३ हजार ३९५ सदनिकांच्या विक्रीसाठी https://bookmyhome.mhada.gov.in/ या नवीन संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज नोंदणीचा शुभारंभ 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते आज करण्यात आला.

यावेळी कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर म्हणाल्या की, IHLMS 2.0 मध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील सदनिकांच्या सोडतीतील समाविष्ट अर्जदारांना उपलब्ध सदनिकांपैकी कुठली सदनिका मिळेल याबाबत निश्चिती नव्हती. मात्र, 'बुक माय होम' संकेतस्थळामुळे अर्जदारास आपल्या पसंतीची सदनिका निवडण्याची मुभा मिळणार आहे. 'बुक माय होम' मुळे अर्जदारांना एक डिजिटल प्लॅटफॉर्म उपलब्ध मिळाला असून ज्याद्वारे विक्रीसाठी उपलब्ध असलेली घरे अर्जदार संकेतस्थळावर पाहू शकतात, त्यांच्या पात्रता व पसंतीनुसार विशिष्ट सदनिकेची निवड करू शकणार आहेत. योजना व घरांच्या सविस्तर माहितीनुसार अधिक उचित निर्णय अर्जदाराला घेण्याची संधी मिळणार आहे.

'बुक माय होम' या संकेतस्थळावर कोकण मंडळाच्या विरार बोळींज, खोणी, शिरढोण, गोठेघर, भंडार्ली येथील गृहनिर्माण प्रकल्पातील विक्री न झालेल्या सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मानवी हस्तक्षेपविरहित संपूर्णतः ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या नूतन प्रणालीनुसार अर्ज नोंदणीकरण करतेवेळी आधार कार्ड, पॅन कार्डची छायांकित प्रत, स्वयंघोषणापत्र आदी बाबी ऑनलाईन संकेतस्थळावर अपलोड करावयाच्या आहेत. IHLMS 2.0 प्रमाणे अर्जदाराने आवश्यक कागदपत्रे अपलोड केल्यानंतर या कागदपत्रांची कुठल्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय ऑनलाईन पडताळणी होणार आहे. सदर पडताळणीनंतर अर्जदाराचा प्रोफाइल तयार होणार आहे. अर्जदाराचा प्रोफाइल तयार झाल्यानंतर अर्जदारास प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील मंडळनिहाय उपलब्ध सदनिकांची माहिती फ्लॅट नंबरसह मिळणार आहे. अर्जदारास या सदनिकांमधून मजला व सदनिका आपल्या पसंतीनुसार निवडता येणार असल्याचे श्रीमती गायकर यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत असलेल्या सदनिकांव्यतिरिक्त इतर सदनिकांसाठी पात्रतेच्या अटी शिथील करण्यात आल्या आहेत. तसेच उत्पन्न गटाचे कुठलेही निकष ठेवण्यात आलेले नाहीत. सदर सदनिकांमध्ये सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती या संवर्गांसाठी सदनिका आरक्षण ठेवण्यात आले आहे, अशी माहिती श्रीमती गायकर यांनी दिली.

###

मुख्य जनसंपर्क अधिकारी/म्हाडा

---

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 762/58 Dt. April 30, 2025

**Press Release**

# Online Application Process Begins for Sale of Flats under First Come, First Serve basis of MHADA Konkan Board through 'Book My Home' Portal

Applicants may now select a flat and floor of their choice as per eligibility from available inventory

Mumbai, April 30, 2025: The Konkan Housing and Area Development Board (a unit of MHADA) has initiated the online application process for the sale of 13,395 unsold flats under various housing schemes through a newly developed digital platform – https://bookmyhome.mhada.gov.in. The platform was formally launched today by Mr. Sanjeev Jaiswal, IAS, Vice President and Chief Executive Officer, MHADA.

Speaking on the occasion, Mrs. Revati Gaikar, Chief Officer, Konkan Board, stated that under the earlier IHLMS 2.0 system, applicants in the First Come, First Serve (FCFS) basis process did not have the facility to select a specific flat. With the introduction of the 'Book My Home' portal, applicants now have the option to view available flats in real time and select a specific unit, including floor and flat number, as per their eligibility and preference. This digital platform provides detailed scheme-level and flat-level information to enable applicants to make informed decisions.

Flats from MHADA's housing projects in Virar (Bolinj), Khoni, Shirdhon, Gotheghar, and Bhandarli have been made available on the platform. The process is fully automated, conducted through an online system without any manual intervention. Applicants are required to upload scanned copies of their Aadhaar card, PAN card, and self-declaration at the time of registration. Once the documents are uploaded, the system conducts digital verification without human interference, following which an applicant profile is created.

Upon completion of verification, eligible applicants can view the list of available flats by location, including flat and floor number, and proceed to reserve the flat of their choice. The selection is confirmed on a first come, first serve basis.

Apart from the flats covered under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY), the eligibility conditions for other flats have been relaxed. No income-related criteria have been prescribed. These flats have been made available for applicants from the General, Scheduled Caste, and Scheduled Tribe categories.

###

Chief Public Relations Officer, MHADA

---


GO LIVE
GO LIVE


MHADA